जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट **दि.१८/०९/२०२५**

'' सन २०२५ नवरात्रौत्सव व पोलीस बंदोबस्ताबाबत माहिती ''

दिनांक २२/०९/२०२५ रोजी ते दिनांक ०२/१०/२०२५ रोजी या कालावधीत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नवरात्र उत्सव साजरा होत आहे. त्यादरम्यान ठाणे आयुक्तालयात रात्रीच्या वेळेस सांस्कृतिक कार्यक्रमात गरबा नृत्य व इतर कार्यक्रम करत असताना व देवी मुर्तींचे विसर्जन होते त्यावेळेस विविध नवरात्र मंडळे प्लाझमा, बिम लाईट, लेझर बिम लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. सदर प्लाझमा, बिम लाईट आणि लेझर बिम लाईट प्रखर प्रकाशामुळे मिरवणूकीत सहभागी झालेले व मिरवणूक पाहण्यास आलेले लहान मुले, वयोवृध्द जेष्ठ नागरीक, सामान्य नागरीक यांचे डोळयास इजा होवून त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच सदर लाईटच्या प्रखर प्रकाशामुळे रस्त्यावरुन जाणारे वाहन चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात किंवा अनूचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर प्रकरणी घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयात नवरात्र उत्सवात गरबा खेळण्याच्या ठिकाणी व मिरवणूकांमध्ये प्लाझमा, बिम लाईट, लेझर बिम लाईटचे वापरास भारतीय सुरक्षा १६३ अन्वये प्रतिबंध घालणे आवश्यक असल्याने मा.पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे, श्रीमती.मिना मकवाना यांनी दिनांक १७/०९/२०२५ रोजी मनाई आदेश काढला आहे. सदर आदेशाचा भंग केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सदर मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुध्द तक्रार करण्यासाठी **टोल फ्री क्रमांक १००, ११२, नियंत्रण कक्ष, ठाणे शहर ९१३७६६३८३९** या क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयात हिंदू धर्मियांचा नवरात्रौत्सव साजरा होणार आहे. त्यात ६०८ सार्वजनिक व ३२५४ खाजगी दुर्गादेवी मुर्तींची स्थापना होणार आहे तसेच एकुण १३३ सार्वजनिक व २८७ खाजगी देवीचे फोटो/प्रतिमांची स्थापना होणार आहे. सदर कालावधीत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकुण ५९० ठिकाणी सार्वजनिक व ५०० ठिकाणी खाजगी गरब्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याव्यतिरीक्त सांस्कृतिक कार्याक्रम, भजन, आर.एस.एस. पथसंचलन, दुर्गा दौड, यात्रा, रावण दहन इत्यादी कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. सदर उत्सवादरम्यान नागरिकांमध्ये अतिशय उत्साहाचे व धार्मिक वातावरण असते. त्यामुळे सदर उत्सवादरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन शांततेभंग होणार नाही या दृष्ट्रीकोनातुन जास्तीत जास्त पोलीस मनुष्यबळ तसेच साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

नवरात्रौत्सवात जास्तीत जास्त महिला/मुली या रास गरबा/दांडिया खेळण्यासाठी जमा होत असतात त्यावेळी त्यांची छेडछाड, विनयभंग, चैन/मोबाईल/पर्स/बॅग स्नॅचिंग होवु नये, कार्यक्रमासाठी येणा-या भाविकांचे मोटारवाहनांची चोरी होवु नये तसेच धार्मिक भावना दुखावुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या दृष्ट्रीकोनातुन साध्या वेशातील जास्तीत जास्त पुरुष/महिला पोलीस अंमलदारांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

सदर कालावधीत धार्मिक तेढ निर्माण करणारे मॅसेजेस/पोस्ट,व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकुन काही समाजकंटक समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा समाजकंटकावर लक्ष ठेवुन त्वरीत कायदेशीर कारवाई करण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सोशल मिडीया सेल देखील सर्तक करण्यात आले आहे . तसेच असे काही मॅसेजेस, पोस्ट, व्हिडीओ बाबत माहिती मिळाल्यास त्वरीत नजिकच्या पोलीस ठाण्यास संपर्क साधण्याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडुन जनतेला अवाहन देखील करण्यात आले आहे.

सदर नवरात्रौत्सव शांततेत पार पडावा या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त-१०, सहाय्यक पोलीस आयुक्त-१८, पोलिस निरीक्षक-१६, सपोनि/पोउपनि-४४, महिला पोलीस अधिकारी-३३, पुरुष अंमलदार -२६७३, महिला अंमलदार-६१०, एसआरपीएफ कंपनी-०१, जीप-५२, ५ टनी- २०, वा.संच -३५, वॉकी टॉकी - १००, दुर्बीण - ०२, डीएफ एमडी - ०१, एचएच एमडी -०२ असा पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडुन सर्व नागरिकांना नवरात्रौत्सवाच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर